भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-०६/१२/२०१७

# प्रेसनोट.

## राञीच्या वेळी कात्रज परिसरात जबरी चोरी करणारे जेरबंद

### भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दिनांक ०१/१२/२०१७ रोजी रात्रौ ११.३० वा.सुमारास इसम नामे प्रकाश यादवराव पाटील वय.५७ वर्ष रा.११ गुनातील अर्पाटमेंट दुसरा मजला लक्ष्मी ॲण्ड संजीवनी हॉस्पीटल जवळ अहमदाबाद राज्य-गुजरात हे मोरेबाग येथुन पायी चालत वंडरसिटी समोरील ट्रॅव्हल्स बसस्टॉप कडे जात असताना तीन अनोळखी इसमांनी मोटार सायकलवरुन त्यांचेजवळ येवुन कोठे जायचे आहे असे विचारले त्यावर त्यांना त्या तीन इसमांना वंडरसिटी येथे माझी अहमदाबाद कडे जाणारी ट्रॅव्हल्स बस थांबली असुन तिकडे चाललो आहे असे सांगितले असता त्यावेळी अनोळखी इसमांनी आम्ही तुम्हांस आमचे मोटार सायकलवरुन सदर ठिकाणी नेवुन सोडतो असे सांगुन त्यांना मोटार सायकलवर बसवुन वंडरसिटी चे मागील बाजुस अंधारात नेवुन त्यांचे खिशातील मोबाईल हॅन्डसेट जबरदस्तीने काढुन घेतला व त्यांना गाडीवरुन खाली ढकलुन देवुन मोटार सायकलवरुन पळुन गेले. म्हणुन गुन्हा नोंद आहे.

दि.५/१२/२०१७ रोजी पो.उप-निरी शिवदास गायकवाड त्यांचे पथकासह पोलीस ठाणे हददीत गंभीर गुन्हयांना प्रतिबंध व्हावा पेट्रोलींग करीत असताना पोलिस कर्मचारी **प्रदीप गुरव व विनोद भंडलकर** यांना बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, तीन ते चार दिवसापुर्वी रात्रीच्या वेळी वंडरसिटी सोसायटीच्या पाठीमागे एका वयस्कर इसमांचे जबरदस्तीने मोबाईल हॅन्डसेट काढुन घेणारे तीन इसमांपैकी दोन इसम हे दत्तमंदीरसमोर भारतनगर गुजरवाडी कात्रज येथे थांबलेले असुन ते अदांजे १९ ते २० वयोगटातील आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन वॉच केला असता बातमीत मिळालेले ठिकाणी बातमीतील इसम थांबले असल्याचे दिसल्याने बातमीप्रमाणे स्टाफचे मदतीने जागीच पकडुन त्यांना आहे त्या स्थितीत ठेवुन त्यास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव पत्ता १).अनिकेत गुलाब झिटे वय.१९ वर्ष रा.दत्तनगर निंबाळकवस्ती गुजरवाडी रोड कात्रज पुणे २).सुमित ऊर्फ कुदंन भिमराव सितापराव वय.२० वर्ष रा. नाना निंबाळकर यांचे शेजारी निंबाळकरवस्ती गुजरवाडी कात्रज पुणे असे असल्याचे सांगितले नंतर त्यांना पोलीस ठाणे येथे आणुन त्याचेकडे अधिक चौकशी करता त्यांनी व त्याचा अल्पवयीन साथीदार असे तिघांनी मिळुन सदरचा गुन्हा केल्याचे सांगितले असुन त्याचेकडुन जबरदस्तीने चोरी केलेला कि.रु १०,०००/- चा मोबाईल हॅन्डसेट व दाखल गुन्हयात वापरलेली कि.रू- ३५,०००/- ची स्पेलेंडर मोटार सायकल असा एकुण कि.रू-४५,०००/- चा मुद्देमाल ताब्यात घेतलेला आहे. दाखल गुन्हयाचा पुढील तपास तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

**ही कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो, अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे, मा.श्री डॉ.प्रविण मुंढे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री कमलाकर ताकवले सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड, पो.कर्मचारी प्रदीप गुरव, विनोद भंडलकर, सचिन ढवळे, गणेश सुतार,समिर बागसिराज, सुमित मोघे, यांचे पथकाने केलेली आहे.**